**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मारुती मूरा वगरे
मु.पो.अंकले , ता.जत, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
(१) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जत, जि.सांगली — उत्तरवादी
(२) पोलीस अधीक्षक, सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा
(१) ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, मौजे अंकले, ता.जत, जि.सांगली
(२) पोलीस उपनिरीक्षक, पोलीस ठाणे जत, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३/ सांगली / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख(विशेष अपील निर्गत मोहीम) | दि.१४.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मारुती मूरा वगरे
मु.पो.अंकले , ता.जत, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा
(१) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जत, जि.सांगली श्रीमती अरुणा द.इटाई
(२) उपमुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रा.पं.), जिल्हा परिषद, सांगली श्री.एस.डी.जोशी

**जन माहिती अधिकारी** तथा
(१) ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, मौजे अंकले, ता.जत, जि.सांगली
श्री.एस.डी.कुंभार
(२) पोलीस उपनिरीक्षक, पोलीस ठाणे जत, जि.सांगली श्री.एस.एस.जगताप

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.२.२००६ व २७.४.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.३.२००६ व १३.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२५.७.२००५ |

८ **मूळ माहितीची मागणी**

१. दि.६.२.२००६ राजी उपमुख्यमंत्र्यांना दिलेले निवेदन(उपमुख्यमंत्र्यांनी त्यावर शेरा दिला होता) जिल्हा परिषदेमध्ये दि.७.२.२००६ रोजी आवकजावक विभागात दिले होते. हा अर्ज गटविकास अधिकारी, पंचायत समिती जत येथे पाठविलेला आहे त्याची प्रत

२. सन २००३ ते २००६ पर्यंत मौजे अंकले येथे ग्रामसभा होत नसून फक्त कागदोपत्री सभा होते त्याचा खुलासा द्यावा.

३. दि.२३.६.२०५ रोजी निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार जत, यांना पत्र दिले होते त्याचा खुलासा मिळावा.

४. शासनाकडून येणाऱ्या योजनांचा लाभ सामान्य लोकांना होत आहे याचा खुलासा. तसेच मागील तीन वर्षात कोणकोणत्या योजना मौजे अंकले या गावास मंजूर आहेत

५. ग्रामपंचायत अंकले येथे पुरवठा होणारे रॉकेल, खाद्यतेल, साखर कार्डधारकांना कसे वाटले व किती आले याचा खुलासा.

६. दि.२९.३.२००४, २९.५.२००४ व २९.६.२००५ च्या शेळ्या चोरीची फिर्याद दिली, त्या अर्जावरील कार्यवाही. तसेच शेती व शेळीपालन व्यवसाय बंद पाडल्या- बाबतची माहिती.

७. मौजे अंकले येथे गट नं.१ मध्ये घराच्या नोंदी कोणत्या आधारे घातल्या, ती जागा कोणाची आहे.

८. द्राक्ष बागेचे झालेले नुकसान भरपाईची माहिती (क्षेत्र ५० आर).

९. दि.४.२.२००५ रोजी ग्रामपंचायत अंकले येथील ज्योतिबा मंदिराचा नोंद असलेला उतारा मागण्यासाठी गेलो असता सरपंच श्री.कुंडलिक सिध्दू सरगर व ग्रामसेवक श्री.उत्तम पाटील यांनी शिविगाळी देऊन धक्काबुक्की केली व माझ्यावर खोटा गुन्हा दाखल करुन दि.५.२.२००५ रोजी अटक केली त्याची माहिती.

## विवेचन

पोलिसांकडे आपण केलेला अर्ज व भावाविरुध्दची शेळ्या चोरीची तक्रार याबाबतची माहिती अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत अंकले

व पोलीस ठाणे, जत यांच्याकडे मागितली होती. तसेच मौजे अंकले, ता.जत, जि.सांगली या गावाच्या विविध प्रश्नांच्या अनुषंगाने ग्रामविकास अधिकारी, गटविकास अधिकारी, जिल्हाधिकारी, तहसीलदार, पोलीस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली इत्यादींकडे प्रशासकीय स्वरुपाचे व माहितीच्या अधिकाराखालील अर्ज श्री.मारुती मूरा वगरे यांनी केले होते. मौजे अंकले ग्रामपंचायतीच्या ग्रामसभा नियमित होत नसून त्याबाबतची माहितीही त्यांनी मागितली होती. ज्योतिबा मंदिराचा उतारा मागणीच्या वेळी ग्रामसेवकांशी गैरवर्तन केल्याच्या आरोपावरुन श्री.वगरे यांच्याविरुध्द पोलिसांनी न्यायदंडाधिकारी, जत यांच्यापुढे दोषारोपपत्र दाखल केले आहे. आपल्याविरुध्दची ही तक्रार खोटी असल्याचे श्री.वगरे यांनी म्हटले आहे. संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे श्री.वगरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

विशेष अपील निर्गत कार्यक्रमात या अपिलाचा समावेश केला गेला होता, परंतु एकमत न झाल्यामुळे व अपीलकर्ता यांनी अपिलाची सुनावणी घेण्याची विनंती केल्यामुळे दिनांक १४.५.२००८ रोजी या अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

ग्रामपंचायतीमध्ये गैरकारभार असून त्याविरुध्द चौकशीची मागणी व अन्य मार्गाने आपण आवाज उठवीत असल्यामुळे आपल्याविरुध्द खोट्या फिर्यादी केल्या जातात, तसेच अन्य मार्गाने आपल्याला पोलीस व अन्य यंत्रणा त्रास देतात, असे प्रतिपादन श्री.वगरे यांनी केले. ग्रामसभेत लोकांना हवी असलेली जी कामे ठरतात, त्यामध्ये श्री.वगरे अडचणी उत्पन्न करतात. सातत्याने प्रत्येक बाबतीत विरोधी अर्ज व तक्रारी करीत राहतात. भावाविरुध्दच्या तक्रारी हा त्यांचा कौटुंबिक प्रश्न आहे, असे प्रतिपादन श्री.एस.डी.कुंभार, ग्रामसेवक, श्री.एस.एस.जगताप, पोलीस निरीक्षक, जत, श्रीमती अरुणा द.इटाई, गटविकास अधिकारी व श्री.एस.डी.जोशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली या सर्वांनी आयोगापुढे सुनावणीच्या वेळी केले.

ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचाराची चौकशी आदी मुद्दे या प्रशासकीय कारवाईच्या मागण्या आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत त्या येत नाहीत. मात्र मौजे अंकले येथे गट नं.१ मध्ये घराच्या नोंदी कोणत्या आधारे घातल्या, त्या जागेची मालकी कोणाची आहे त्याच्या

कागदपत्रांच्या प्रती, ज्योतिबा मंदिराचा नोंद असलेला उतारा व अतिक्रमणासंदर्भातील माहिती त्यांना दिली गेली पाहिजे.

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) जागेच्या मालकीची कागदपत्रे व अतिक्रमणासंदर्भातील माहितीची प्रत अपीलकर्त्यास निःशुल्क देऊन पूर्तता अहवाल गटविकास अधिकारी यांनी आयोगाला सादर करावा.

पुणे
दि.२३.६.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सदाशिव दत्तात्रय निकम
१४, टेक्निकल हौसिंग सोसायटी, ए वॉर्ड,
वाशी रोड, कोल्हापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचीव, श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस,
शिवाजी पेठ, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, महाराष्ट्र हायस्कूल,
शिवाजी पेठ, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३० / कोल्हापूर / २००६ |
| २ | विशेष अपील निर्गत मोहीम | दि.१३.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सदाशिव दत्तात्रय निकम
१४, टेक्निकल हौसिंग सोसायटी, ए वॉर्ड,
वाशी रोड, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचीव, श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस,
शिवाजी पेठ, कोल्हापूर प्रतिनिधी श्री.शंकर कुंभार, सहा.लिपीक

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, महाराष्ट्र हायस्कूल,
शिवाजी पेठ, कोल्हापूर प्रतिनिधी डॉ.व्ही.जी.पाटील, हेडक्लार्क

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.१.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>श्री.गोपाळ हरी चांदणे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक यांचा दि.२०.२.२००३ चा अर्ज व यासाठी आपणांस वेळोवेळी पाठविलेली स्मरणपत्रे यास अनुसरुन-(जुलै १९९४ ते आजअखेर)<br>१. रजा रोखीकरण बिलासंबंधी केलेली कारवाई आणि खर्ची टाकलेल्या कॅशबुक नोंद आणि सुवापुस्तक नोंदीची प्रमाणित प्रत<br>२. हे प्रकरण ज्या टेबल प्रमुखाकडे आहे आणि होते त्यात्या अधिकाऱ्यांची नांवे / पद आणि त्यांचे मासिक वेतनाचा संपूर्ण तपशील<br>३. अर्जावर कारवाई झाली नसलेस दप्तर दिरंगाईचा कायदा मे-२००६ अन्वये केलेल्या कारवाईची किंवा प्रस्ताव किंवा टिपणीची प्रमाणित प्रत<br>४. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम-४ अन्वये स्वतःहून जाहिर करावयाची माहिती आपल्या प्राधिकरण कार्यालयात कोठेही दिसून येत नाही त्याची एक प्रत |
|---|---|

## विवेचन

श्री.गोपाळ हरी चांदणे यांच्या रजा रोखीकरण बिलासंबंधी केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता श्री.सदाशिव दत्तात्रय निकम यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, महाराष्ट्र हायस्कूल, शिवाजी पेठ, कोल्हापूर, जि.कोल्हापूर यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली नाही व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची दखल घेतली नाही, म्हणून जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती व अपीलकर्त्याला खर्चाची भरपाई मिळावी, या मागणीसाठी श्री.निकम यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

कोल्हापूर येथील विशेष अपील निर्गत कार्यक्रमात दि.१३.५.२००८ रोजी या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. परंतु यामध्ये एकमत न झाल्यामुळे नमुनापत्रात नमूद केलेल्या माहितीच्या व उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे निर्णय घेण्यात आला.

आयोगाकडील प्रलंबित अपिलांच्या संदर्भातील सद्यस्थितीबाबत आयोगाने सर्व संबंधितांना जानेवारी २००८ मध्ये विचारणा केली होती. तेव्हा मूळ स्थिती कायम असल्याचे श्री.निकम यांनी आयोगाला कळविले होते, तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्री.आर.डी.पाटील यांनी रजा रोखीकरणाचे प्रकरण पे-युनिट, कोल्हापूरकडे पाठवीत असल्याचे कळविले होते. 'पूर्वीच्या सर्व कागदपत्रांचा अभ्यास करुन पाहिले असता पूर्वी रक्कम उचलली नाही असे स्पष्ट झाले.

श्री.चांदणे यांच्याशी तोंडी संपर्क साधला. आता हे रजा रोखीकरणाचे प्रकरण आम्ही सत्वर पे युनिट, कोल्हापूरकडे पाठवित आहोत. तथापि त्यांच्या स्वत:च्या कारकिर्दीत संस्थेने ठराव करुनही रोखीकरण प्रकरण का पाठविले नाही हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो', असे श्री.पाटील यांनी या पत्रात नमूद केले होते.

या विषयाची माहिती श्री.निकम यांना दिली नव्हती, मात्र श्री.चांदणे यांना कळविली होती असे जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.व्ही.जी.पाटील व अपिलीय प्राधिकारी प्रतिनिधी श्री.शंकर ज्योती कुंभार यांनी विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नमुनापत्रात नमूद केले आहे.

श्री.चांदणे यांच्या संदर्भातील आर्थिक बाबींची माहिती श्री.निकम यांनी मागितली आहे व अशी माहिती श्री.निकम यांना देण्याबाबत श्री.चांदणे यांचे म्हणणे काय, हे उभ्य बाजूंनी जाणून घेणे आवश्यक होते. ते केलेले नाही. तसेच मूळ मागणी रजा रोखीकरणाची रक्कम मिळण्याची आहे, ती 'माहिती'या सदरात येत नाही. मात्र माहितीच्या अधिकाराखाली पाठपुरावा केल्यानंतर हा विषय मार्गी लागला आहे, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचे प्रतिनिधी श्री.व्ही.जी.पाटील यांनी नमुनापत्रात नमूद केलेल्या नोंदीवरुन दिसते. 'सर्व प्रकरण अद्ययावत करुन शासनाकडे पाठविले आहे, मंजूर झाले आहे', असे त्यांनी नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.७.६.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (खंडपीठ, पुणे) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. विनायक दिनकर गोखले
७९९८/२, शिवरंजनी, स्टेशन रोड,
मिरज, जि. सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
अधीक्षक, भूमि अभिलेख, सांगली, जि. सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
नगर भूमापन अधिकारी, सांगली, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३१ / सांगली |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>सांगली येथील वखार भाग क्षेत्रातील सिटी सर्व्हे क्र.२४ च्या संदर्भातील अहवाल | |

## विवेचन

सांगली येथील वखार भाग क्षेत्रातील सिटी सर्व्हे क्र. २४ च्या संदर्भात दि. १६.८.२००६ रोजी केलेल्या अर्जानुसार अहवाल आजतागायत का पाठविण्यात आला नाही, त्यासाठी असलेली विहित कालमर्यादा, गेल्या चार वर्षात सत्ताप्रकार बदलण्याबाबत अधीक्षक भूमि अभिलेख, सांगली कार्यालयातर्फे कोणत्या मिळकतींचा अहवाल पाठविण्यात आला, याची माहिती अपीलकर्ता श्री. विनायक दिनकर गोखले यांनी जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, सांगली यांच्याकडे मागितली होती.

आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि. १४.५.२००८ रोजी सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये या अपिलाचा समावेश होता. सदर विशेष अपील निर्गत कार्यक्रमामध्ये अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे माहितीबाबत एकमत

झाले नाही. त्यामुळे आयोगाला सादर करण्यात आलेले कागदपत्र विचारात घेऊन निर्णय करण्यात येत आहे.

श्री. गोखले यांनी दि. १७.१०.२००६ रोजी माहिती-मागणीचा अर्ज केला होता. जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, सांगली श्री. डी. एम. खैरमोडे यांनी त्यावर कोणतेच उत्तर न दिल्यामुळे श्री. गोखले यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, सांगली यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकारी श्री. व्ही. एन. परदेशी यांनी अपील दाखल करून न घेता अपीलकर्त्याला आवश्यक असलेली माहिती देण्याच्या सक्त सूचना जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, सांगली यांना दिल्याचे श्री. गोखले यांना कळविले, व त्या कार्यालयाशी संपर्क साधून माहिती घेण्यास सांगितले. जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तर न पाठविणे व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अशा प्रकारे सूचना देणे हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा भंग आहे, असे नमूद करून श्री. गोखले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. गोखले यांचा अर्ज आपल्याला दि. २६.१०.२००६ रोजी प्राप्त झाला. मुदतीत माहिती / उत्तर देण्यापूर्वीच त्यांनी दि. २२.११.२००६ रोजी अधीक्षक, भूमि अभिलेख, सांगली यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे श्री. गोखले यांनी आपल्या कार्यालयाशी संपर्क साधला असता, तर माहिती देता आली असती, परंतु त्यांनी अद्याप संपर्क साधला नाही. त्यांना हवी असल्यास, उपलब्ध अभिलेखानुसार माहिती देण्यात येईल, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. डी. एम. खैरमोडे यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे.

श्री. गोखले यांनी दि. १६.८.२००६ रोजी अधीक्षक, भूमि अभिलेख, सांगली यांच्याकडे अर्ज केला होता. अहवाल मागणीसाठी तो दि. २३.८.२००६ रोजी नगर भूमापन अधिकारी, सांगली यांच्याकडे पाठविण्यात आला. त्यांच्याकडून दि. ३१.१.२००७ रोजी अहवाल प्राप्त झाला. दरम्यान श्री. गोखले यांनी दि. २४.१.२००७ रोजी मिळकतीचा सत्ता प्रकार बदलून मिळण्यासाठी अर्ज केला व दि. १६.८.२००६ च्या अर्जावर कार्यवाही झाली नसल्याचे या अर्जात नमूद केले. त्याबाबत त्यांच्या अपिलाची सुनावणी घेऊन दि. ५.६.२००७ रोजी सत्ता प्रकार बदलता येत नसल्याचा निर्णय देण्यात आला, असे अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, सांगली श्री. व्ही. एन. परदेशी यांनी आयोगाला सादर केलेल्या दि. ७.११.२००७ च्या निवेदनात नमूद केले आहे. त्याची प्रत श्री. गोखले यांनाही पाठविण्यात आली आहे.

श्री. गोखले यांचा अर्ज दि. १७.१०.२००६ चा असून आपल्याला तो दि. २६.१०.२००६ रोजी मिळाल्याचे श्री. खैरमोडे यांचे म्हणणे आहे. श्री. गोखले यांनी ३० दिवस पूर्ण होण्याआधीच प्रथम अपील केले आहे. तांत्रिकदृष्ट्या जन माहिती अधिकारी यांना विलंब झालेला नाही, ही वस्तुस्थिती असली तरी, जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यानंतरही माहिती पुरविली नाही. अपीलकर्त्याने संपर्क साधल्यास माहिती दिली जाईल, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले आहे, ते योग्य नाही. माहिती टपालाने पाठवावी, असे श्री. गोखले यांनी अर्जात स्पष्टपणे नमूद केले आहे. मात्र श्री. गोखले यांची मूळ मागणी सत्ता प्रकार बदलण्याच्या संदर्भातील असून त्या अनुषंगाने त्यांनी अर्ज व अन्य पत्रव्यवहार केला आहे. राज्य माहिती आयोगाकडील अपिलाच्या संदर्भात ते स्वतः सुनावणीस उपस्थित नव्हते, अगर त्यांनी निवेदनही सादर केले नाही. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती तयार ठेवली असल्याचे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरून दिसते. मात्र अपीलकर्त्याने संपर्क साधावा, असे प्रथम अपिलाच्या निर्णयात नमूद केल्याचा तांत्रिक आधार तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी घेत आहेत, ते योग्य नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील मान्य.

२. जन माहिती अधिकाऱ्यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसात अपीलकर्त्यास माहिती निःशुल्क द्यावी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

३. माहिती तयार असूनही अपीलकर्त्यास न पाठविल्याबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. डी.एम.खैरमोडे व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, सांगली सौ. रोहिणी शरद सागरे यांना, तसेच आदेशाची अंमलबजावणी होण्याची दक्षता न घेतल्याबद्दल अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, सांगली श्री. व्ही. एन. परदेशी यांना समज देण्यात येत आहे.

पुणे
दि. २४.६.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३३ / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | डॉ. अ. आ. हिरेमठ<br>मु.पो.नांदणी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर |
| ३ | जन माहिती अधिकारी | डॉ. जे.जे.मगदूम, होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज,<br>जयसिंगपूर, जि. कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | डॉ. जे.जे.मगदूम, होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज,<br>जयसिंगपूर, जि. कोल्हापूर |
| ५ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br>निवृत्ती वेतन, ग्रॅच्यूयटी, पेन्शन, प्रॉ. फंड इत्यादी संबंधातील नियमबाबतची माहिती | |

वरील तीनही घटकांमध्ये झालेल्या चर्चेनुसार अपिलीय प्राधिकारी यांनी पंधरा दिवसात कागदपत्रांची पूर्तता करून माहिती देण्याचे मान्य केले. यापूर्वी डॉ. हिरेमठ यांनी यासंदर्भात माहिती मागणीचे अनेक अर्ज केले असून त्यानुसार माहिती दिली असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून दिसते. माहिती पंधरा दिवसात दिल्यास अपील निकाली काढण्यास अपीलकर्त्याने अनुमती दिली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यास चर्चेमध्ये दिलेल्या आश्वासनानुसार पंधरा दिवसात माहिती उपलब्ध करून द्यावी व त्याचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि. ५ .६.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.११.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३५/ पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. मारुती शाबू जगताप, मु.पो. करुंज, ता. मावळ, जि. पुणे. | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, सांगली, जि. सांगली | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अधीक्षक भूमी अभिलेख, सांगली | हजर |

अपीलकर्त्याने मौजे बाळेखिंडी, ता. जत, जि.सांगली येथील सर्व्हे क्र.२७१ चे संबंधात हिस्सेदारनिहाय पोटखराब व लागवडलायक क्षेत्र लिहून मिळावे, ही मागणी केली होती. त्यानुसार शुध्दिपत्रक होऊन माहिती मिळणे अपेक्षित आहे. कार्यवाही पूर्ण करून शुध्दिपत्राची प्रमाणित प्रत मिळावी, अशी त्यांची मागणी होती.

सदरची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कक्षेत येत नसली तरी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, जत यांनी अंतिम कार्यवाही पूर्ण केली. मात्र अंतिम शुध्दिपत्रकावर शासनस्तरावरून स्थगिती आदेश प्राप्त झाल्याने ७/१२ दुरूस्ती झाली नाही.

संचिकेतील सर्व कागदपत्रांचे अवलोकन करता माहिती देण्यात आल्याचे दिसते. अन्य मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३०.६.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

११.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४३ / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | श्री. अब्दुलगणी करीमसाहेब मुल्ला<br>मु.पो. वडणगे, ता. करवीर, जि. कोल्हापूर |
| ३ | जन माहिती अधिकारी | गट विकास अधिकारी, पंचायत समिती करवीर,<br>ता. करवीर, जि. कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जि.प. कोल्हापूर |
| ५ | <u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u><br><br>मौजे वडगण, ता. करवीर येथील ग्रामसेवक श्री. के. बी. पाटील यांचेविरूध्द केलेल्या तक्रारीचा चौकशी अहवाल सादर केला असल्यास त्याची प्रत | |

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचे आदेशानुसार दि. ११.४.२००७ रोजी पंचायत समितीने केलेल्या चौकशी अहवालाची मागणी दि. ९.५.२००७ रोजी केली. परंतु अद्याप पर्यंत अहवालाची माहिती मिळाली नाही, असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे.

दि. ११.४.२००७ रोजी केलेल्या चौकशीनुसार अहवाल तयार करून त्याची प्रत संबंधितांना देणेत येऊन अपील निकाली काढणेत यावे, असे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

संबंधित चौकशी अधिकारी यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतलेने माहिती देण्यास विलंब झाला. त्यानंतरचे चौकशी अधिकारी श्री. मिसाळ यांनी चौकशी केली असून अहवाल १० दिवसात देणेची कार्यवाही करण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले आहे.

दि. ३०.७.२००७ पूर्वी चौकशीनुसार अहवाल तयार करण्यात आलेला नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी विशेष अपील निर्गत कार्यक्रमातंर्गत नमुना पत्रात केलेल्या नोंदीवरून दिसते. ही बाब दखल घेण्याजोगी असली तरी प्रशासकीय कार्यवाहीच्या पूर्ततेसंबंधीची असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये समाविष्ट होत नाही. मात्र दुसरे चौकशी अधिकारी श्री. मिसाळ यांनी चौकशी पूर्ण करून अहवाल कधी सादर केला, हे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी स्पष्ट केलेले नाही. विशेष अपील निर्गत कार्यक्रमाच्या दि. १३.५.२००८ पर्यंत आपल्याला माहिती मिळाली नसल्याचे अपीलकर्त्याने नमूद केले आहे. हा विलंब अक्षम्य आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. संबंधित चौकशी अहवालाची प्रत अपीलकर्त्यास नि:शुल्क उपलब्ध करून देऊन त्याचा पूर्तता अहवाल जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगास सादर करावा.

३. माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबाबतचे तारीखवार स्पष्टीकरण जन माहिती अधिकाऱ्यांनी हा आदेश मिळाल्यापासून ८ दिवसात आयोगास सादर करावा. सदरचा अहवाल मुदतीत आयोगास सादर न केल्यास शास्तीबाबतचा पुढील निर्णय घेण्यात येईल.

पुणे
दि. १६ .६.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४७ / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | श्री. पांडूरंग ईश्वरा आडसूर<br>रा. माणगावं, पो. आकुळे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत शाखा,<br>जिल्हा परिषद, कोल्हापूर जि. कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर |
| ५ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | सन १९६६ ते २००० या काळातील भ्रष्टाचारी प्रकरणाबाबत केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती |

वरील तीनही घटकांमध्ये झालेल्या चर्चेनुसार अनुक्रमे समाज मंदिराबाबत प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर, तसेच पाणीपट्टी वसुली व ग्रामपंचायत गैरकारभाराबाबत प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडे प्रथम अपील दाखल करण्याचे ठरले. ती प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले आहे. सदर अपील निकाली काढण्यास अपीलकर्त्याने अनुमती दिली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** ५.६.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**